प्रति,

प्राचार्य,

............................................

विषय :- १७ जून ते ३ जूलै २००९दरम्यान पुणे ते पंढरपूर दिंडी मार्गावर रा.से.यो.

'राज्यस्तरीय उर्जा दिंडी' आयोजनाबांबत......

मागील ५ वर्षापासून रासेयो कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन व पुणे विद्यापीठ, पुणे यांचे संयुक्त विद्यमाने 'राज्यस्तरीय उर्जा दिंडी' आयोजीत करीत आहे.

या वर्षी देखील राष्ट्रीय सेवा योजना कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मुंबई, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र उर्जा प्राधीकरण, पुणे विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने "राज्यस्तरीय उर्जा दिंडीचे" आयोजन दि. १७ जून ते ३ जूलै २००९ या कालावधीत करण्यात आले आहे. या उर्जा दिंडीचा मुख्य उद्देश्य उर्जा बचत, अक्षय प्रकाश योजना इ. विषयांवर जनजागरण व यातूनच स्वयंसेवक व्यक्तीमत्व विकास करणे हा आहे.

दि. १७ व १८ जून २००९ रोजी सहभागी स्वयंसेवकांना दिंडी प्रवासासंबधी प्रशिक्षण पुणे विद्यापीठ येथे देण्यात येईल. संबंधितास दिनांक १७ जून २००९ रोजी पुणे विद्यापीठ, पुणे येथे स. ११.०० वाजेपर्यंत येणे आवश्यक आहे. उर्जा दिंडीची सुरूवात दि. १८ जून २००९ रोजी स. ११.०० वाजता पुणे विद्यापीठ येथून करण्यात येईल. उर्जा दिंडीची सांगता दि. ३ जूलै २००९ रोजी स. ११.०० वाजता पंढरपूर महाविद्यालय येथे होईल.

जिल्हा समन्वयकांनी सुचविल्या प्रमाणे, आपल्या महाविद्यालयातील .................................................रासेयो स्वयंसेवक/कार्यक्रम अधिकारी यांची या दिंडीसाठी निवड करण्यात आली आहे.

कृपया दिनांक १७ जून २००९ रोजी, रासेयो कक्ष पुणे विद्यापीठ पुणे येथे खालील कागदपत्रे /साहीत्य घेऊन उपस्थीत रहावे.

वैद्यकीय दाखला व पालकाचे, प्राचार्यांचे संमतीपत्र, ओळखपत्र इ. स्वयंसेवकांसोबत असणे आवश्यक आहे. रोज लागणारे कपडे पांढरी टोपी, गांधी टोपी, रेनकोट, टोपीसहीत टॉर्च म्गजतं ब्मसस सहीत, चादर , सतरंजी (हलक्या

वजनाची), धोतर पायजमा/नेहरू शर्ट (सफेद रंगाचे) तसेच वाटी, ताट, ग्लास, चमचा, पासपोर्ट आकाराचे दोन फोटो व अत्यावश्यक साहित्य इ. या उर्जा दिंडीसाठी आपण सहकार्य करावे ही विनंती.

सहभागी स्वयंसेवक/कार्यक्रम अधिकारी यांचा आपल्या महाविद्यालयांपासून ते पुणे विद्यापीठ व पंढरपूर पासून ते महाविद्यालयापर्यंतचा एस.टी/रेल्वेचा दुस-या वर्गाचा जवळच्या मार्गाचा खर्च महाविद्यालयाच्या रासेयो निधी मधुन करण्यात यावा.

कृपया वरील स्वयंसेवक/कार्यक्रम अधिकारी यांच्या सहभाग विषयी त्वरीत कळविण्यात यावे.

धन्यवाद

आपला विश्वासू,

प्रो. अतुल हं. साळुंके,
प्रभारी कार्यक्रम समन्वयक,रासेयो.